मानसिक आजारांवर त्वरित उपचार शक्य

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : तणाव आणि चिंता या प्रती समाजाचा दृष्टीकोण लवचिक आहे तर मनोविकृती आणि व्यक्तीमत्व विकारापासूनी समाजात भय असते, असे युनिव्हर्सिटी ऑफ कॅम्ब्रीजच्या संशोधनात समोर आले आहे. नऊ वेगवेगळ्या आजारांवर करण्यात आलेल्या चाचण्यांमध्ये लोकांपासून ज्ञान आणि राखण्याची इच्छा मनोविकृती आणि व्यक्तिमत्व विकार या प्रकरणात अधिक होती असे समोर आले. या सर्व प्रकरणात भय किंवा दहशत हेच सर्वात मोठे कारण असल्याचेही समोर आले, असे या अभ्यासाचे लेखक रॉबिन बेली यांनी नमूद केले आहे.

मानसिक आजाराची लक्षणे मानसिक आजाराचा जीवनाच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम कमी करण्यास मदत करू शकतो. यामुळे आजाराची तीव्रता देखील कमी होऊ शकते आणि कदाचित गंभीर मानसिक आजारला विलंब होऊ शकतो किंवा पूर्णपणे रोखता येऊ शकतो.

यापैकी एक किंवा दोन लक्षणे मानसिक आजाराचे निदान असू शकत नाहीत, परंतु दुर्दीव तपासणीची आवश्यकता दर्शवू शकतात. जर एखाद्या व्यक्तीला एकाच वेळी अनेक लक्षणे जाणवत असतील आणि ही लक्षणे अभ्यास करण्यात, काम करण्यात किंवा इतरांशी संपर्क साधण्यात गंभीर समस्या निर्माण करत असतील, तर त्यांनी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक परिवार एक बँक
गृह कर्ज
@ 7.10 %*
शून्य प्रक्रिया शुल्क
मिस्ड कॉल द्या 8010 614 614 | जवळपासची शाखा दर्शक करा

डॉ. मानसी
Tanvi HERBALS
क्लिनिक
डॉ. पुष्कराज धामणकर
आजच अपॉइंटमेंट बुक करा
फ्री चेकअप कॅम्प
लठ्ठपणा ? पायाला सूज ?
चालताना दम लागतोय ?
9833683021

जेवणावरून वाद, एकाची हत्या

अमरावती : जेवणावरून झालेल्या वादात एका बारा वर्षीय मुलाची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली. त्यानंतर अपघाताचा बनाव रचण्यात आला. मात्र, पोलिसांच्या तपासात घटनेचे बिंग फुटले. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्यापैकी एकाला अटक करण्यात आली. दुसऱ्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना बुधवारी रात्री भातकुली ठाण्याच्या हद्दीत चेचरवाडी मार्गावर घडली. जितेराजा अरुण गौड (१२) रा. बरायटा, मध्यप्रदेश असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी बब्बू बिसनाथ गौड (२२) व अरुण गौड (४२) दोघेही रा. बरायटा, मध्यप्रदेश यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यापैकी अरुणला अटक केली असून बब्बूवर उपचार सुरू आहेत.

विश्व मराठी संमेलनाचे आज उद्घाटन

ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे, श्रीनिवास कुलकर्णी, मारुतीबाबा कुरेकर यांचा सन्मान

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा जागतिक पातळीवर प्रचार आणि प्रसार करण्यासाठी नाशिक येथे आयोजित चौथ्या विश्व मराठी संमेलनास शुक्रवारपासून प्रारंभ होत असून दुपारी तीन वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटनानंतर डॉ. भालचंद्र नेमाडे यांना साहित्य भूषण, श्रीनिवास कुलकर्णी यांना विद्या करंदीकर जीवनगौरव, तर मारुतीबाबा कुरेकर यांना विश्व मराठी संमेलनाच्या विशेष पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या आवारात तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात विविध व्याख्याने, परिसंवाद आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांच्यासह छगन भुजबळ, गिरीश महाजन, दादा भुसे, उदय सामंत, नरहरी झिरवाळ या मंत्र्यांसह विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महापौर हेमंतोरी आडके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सर्वांकडी पुरस्कारार्थीच्या चर्चासत्रानंतर सांस्कृतिक कार्यक्रम होतील.

अजय-अतुल यांना कलारत्न पुरस्कार

रविवारच्या सत्रात मराठी भाषेतील युवावर्गाचा सहभाग हा परिसंवाद होईल. यामध्ये प्रा. राम शिंदे, राहुल नार्वेकर, डॉ. नीलम गोऱ्हे, विश्वास नांगरे पाटील सहभागी होणार आहेत. याशिवाय अभ्यासक्रमातील मराठी भाषा, मराठी चित्रपटाची आधुनिकीकरण हे परिसंवाद होतील. सायंकाळी पाच वाजता राज्यपाल आचार्य देवव्रत, प्रा. राम शिंदे, राहुल नार्वेकर, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत आदींच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. या कार्यक्रमात कलारत्न पुरस्काराने संगीतकार अजय-अतुल यांना सन्मानित केले जाणार आहे.

शनिवारच्या सत्रात माध्यमातील मराठी भाषा, सांस्कृतिक विश्वातील मराठी भाषा, समाज माध्यमांवरील मराठी प्रभावक हे परिसंवाद होतील. सायंकाळी अभिमान मराठी-अभिजात मराठी हा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. याच दिवशी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत मराठी माध्यम शाळा सक्षमीकरण या विषयावरील परिसंवाद होणार आहे. त्यानंतर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मराठीतील वापर, मराठी प्रकाशनाचे बदलते प्रवाह, आंतरराष्ट्रीय मंच हे परिसंवाद होतील.

बँक ऑफ बड़ौदा Bank of Baroda India's International Bank
https://bankofbaroda.bank.in
ई-लिलाव सह विक्री सूचना
बँक ऑफ बडोदा बँकेच्या मालकीच्या वाहनांच्या ई-लिलाव-सह-विक्रीसाठी "जसे आहे, जिथे आहे आणि ज्या स्थितीत आहे" या तत्त्वावर ऑफर आमंत्रित करित आहे.
सविस्तर तपशील बँकेच्या वेबसाइट: https://bankofbaroda.bank.in वर "ई-लिलाव विभाग" अंतर्गत आणि "auctiontiger" च्या वेबसाइट https://www.auctiontiger.net/. वर उपलब्ध आहेत.
जर काही अतिरिक्त माहिती असेल तर ती बँकेच्या वेबसाइटवर 'ई-लिलाव विभाग' अंतर्गत जारी केले जाईल. बोलीदारांना त्यांचा प्री-बिड ईएमडी सादर करण्यापूर्वी लिलाव सुरू करण्यापूर्वी वेबसाइट तपासण्याचा सल्ला देत आहोत.
ईएमडी/प्री-बिड फॉर्म जमा करण्याची अंतिम तारीख: 20/03/2026 संध्याकाळी 4.00 पूर्वी.
लिलावाची तारीख आणि वेळ: 24/03/2026 सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 वाजेपर्यंत.
ललित नारायण मोहंता
सहाय्यक महाव्यवस्थापक
कॉर्पोरेट ऑफिस प्रशासन (सीओए)
बडोदा कॉर्पोरेट सेंटर, बीकेसी, मुंबई
स्थळ: मुंबई
तारीख: 25.02.2026
(17125-JD)

FEDBANK FINANCIAL SERVICES LTD.
फेडबँक फायनॅन्शिअल सर्व्हिसेस लि.
नोंदणीकृत कार्यालय: युनिट क्र. 1101, अकराव्या मजला, सिग्नस, प्लॉट क्र. 71 ए, वर्धा, पारपोळी, मुंबई-400087
मागणी सूचना
खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांनी (यापुढे "कर्जदार" असा उल्लेख करण्यात येईल) कर्ज घेण्यासाठी आपल्या अचल मालमत्ता (अनामती) फेडबँक फायनॅन्शअल सर्व्हिसेस लिमिटेड (यापुढे "फेडबँक" असा उल्लेख करण्यात येईल) कडे तारण ठेवलेल्या आहेत. कर्जदारांनी कर्जाच्या रकमेची परतफेड न केल्याने सदर कर्ज अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आले आहे. या संदर्भात, फेडबँकचे खाली प्रेषितीस निरबुद्धिमत्तेशिवाय अॅड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शअल असेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना पाठविलेली आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, 2002 मधील अनुच्छेद 13(2) व नियम 3(1) अंतर्गत पर्यायी सेवा म्हणून तपशील येथे प्रकाशित करण्यात येत आहे. अशापासि विनंती करण्यात येते की आपण सदर सूचना प्रकाशित होण्यापासून दिनांकापासून 60 दिवसांचे आत मागणी सूचनेत नमूद रकमेचा सौहार्दपूर्ण व्यवहार भरणा करावा. तसे न केल्यास स्वाक्षरीकार फेडबँकच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) व 14 अंतर्गत सदर मालमत्तेवर योग्य ती कारवाई करतील.
कर्जदार, सह-कर्जदार, अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना, मागणी केलेली रक्कम आणि अचल मालमत्तेचे तपशील खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	कर्जदार/ सह-कर्जदाराचे मालमत्ता धारकाचे नाव	अनामत मत्ता / तारण मालमत्तेचे वर्णन	अनु. 13(2) अंतर्गत मागणी सूचना दिनांक व एकूण थकबाकी
1	कर्ज खाते क्रमांक: FEDAMASTL050176 8 & FEDAMASTL0518273 1. वैभव प्रल्हादराव धाकुलकर (कर्जदार), 2. प्रल्हाद एल धाकुलकर (सह-कर्जदार), 3. रत्नमाला पी धाकुलकर (सह-कर्जदार)	बाब क्र. 1 - तारण मालमत्ता नमुना प्लॉट क्र. 1200, एकूण क्षेत्रफळ सुमारे 696.50 चौ.मी., दक्षिण बाजूच्या भागापर पूर्व पश्चिम विस्तारत, क्षेत्रफळ सुमारे 251 चौ.मी. आणि त्यावर बांधलेले घर, नमुना गोट क्र. 4, मौजे तळेगाव दशासर, ता. धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती - 444710, महाराष्ट्र. चतुर्सीमा: पूर्वेस- मंदिर, पश्चिमेस- श्रीराम शावडे यांचे घर, उत्तरेस- त्याच प्लॉटच्या उर्वरित भाग, दक्षिणेस- श्री. केळे यांचे घर. बाब क्र. 2- तारण मालमत्ता मालमत्ता क्र. 1274 आणि 1275, मौजे तळेगाव दशासर, ता. धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती - 444710, महाराष्ट्र.	एनपीए दिनांक: 4/1/2026 मागणी सूचना दिनांक: 3/2/2026 3/2/2026 रोजी रु. 2008711/- (रुपये वीस लक्ष आठ हजार सातशे अकरा फक्त) म्हणजे कर्ज खाते क्र. FEDAMASTL050176 8 अंतर्गत रु. 1447300/- (रुपये चौदा लक्ष सत्तेचाळीस हजार तीनशे फक्त) आणि कर्ज खाते क्र. FEDAMASTL0518273 अंतर्गत रु. 561411/- (रुपये पाच लक्ष एकसष्ट हजार चारशे अकरा फक्त)

याद्वारे कर्जदारांना आवाहन करण्यात येते की त्यांनी मागणी सूचनेचे पालन करावे आणि तयार आणि वर नमूद रकमेचा सदर प्रकाशनाच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत वसुलीच्या दिनांकापर्यंतचे पुढील लागू व्याज, अतिरिक्त व्याज, खर्च व अधिभारांसह परत करावा. कर्जदारांनी लक्षात घ्यावे की फेडबँकला हे सुरक्षित धनको आहेत आणि कर्जदारांनी प्राप्त केलेली कर्जे सुविधा ही कर्जदारांनी तारण ठेवलेल्या तारण अनामत मालमत्तेवर घेतलेले सुरक्षित कर्जे आहे. कर्जदारांनी विहित कालावधीत आपल्या संपूर्ण दायित्वांची पूर्तता न केल्यास फेडबँकला सौजन्य सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत सर्व अधिकारांचा वापर करून अनामत मत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार असेल ज्यात इतर बाबींशिवाय सदर अधिनियम व नियमांतर्गत उल्लेख असलेल्या इतर कोणत्याही उपायाचा वापर करीत तिची विक्री करून रकमेची वसूली करण्याची समावेश आहे. विक्री किंवा हस्तांतरण करण्यासंदर्भात अनामत मत्तेवर तारण आणण्याचा आणि / किंवा ती मोहतबर करण्याचाही एकाधिक्रार सोबत अधिकार आहे. अनामत मत्तेची विक्री किंवा हस्तांतरण फेडबँकच्या सौजन्य सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत सर्व अधिकारांचा वापर करून अनामत मत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार असेल ज्यात इतर बाबींशिवाय सदर अधिनियम व नियमांतर्गत उल्लेख असलेल्या इतर कोणत्याही उपायाचा वापर करीत तिची विक्री करून रकमेची वसूली करण्याची समावेश आहे. विक्री किंवा हस्तांतरण करण्यासंदर्भात अनामत मत्तेवर तारण आणण्याचा आणि / किंवा ती मोहतबर करण्याचाही एकाधिक्रार सोबत अधिकार आहे. अनामत मत्तेची विक्री किंवा हस्तांतरण फेडबँकच्या सौजन्य सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत सर्व अधिकारांचा वापर करून अनामत मत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार असेल ज्यात इतर बाबींशिवाय सदर अधिनियम व नियमांतर्गत उल्लेख असलेल्या इतर कोणत्याही उपायाचा वापर करीत तिची विक्री करून रकमेची वसूली करण्याची समावेश आहे. विक्री किंवा हस्तांतरण करण्यासंदर्भात फेडबँकच्या सौजन्य सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत सर्व उपायांविषयी व वेगळा आहे.
अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(8) कडे वेधण्यात येते आणि तसेच सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(13) कडे वेधण्यात येते त्यानोरे कर्जदारांना फेडबँकच्या याच्या लेखी पूर्व-परवानगीशिवाय अनामत मत्तेचीकी कसायची विक्री, भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही मार्गाने (सामान्य वापर वगळता) हस्तांतरण करण्यास आणि कोणताही व्यवहार करण्यास मज्जाव करण्यात येत आहे आणि वरीलचे उल्लंघन करणे हा सदर अधिनियमातील अनुच्छेद 29 अंतर्गत दंडास पात्र आहे.
मागणी सूचनेची प्रत निम्नस्वाक्षरीकारकडे उपलब्ध आहे. मागणी सूचनेची प्रत निम्नस्वाक्षरीकारकडे उपलब्ध आहे आणि कर्जदारांची इच्छा असल्यास ते ती कोणत्याही कामाच्याच दिवशी कामकाजाच्या वेळेत निम्नस्वाक्षरीकारकेडून प्राप्त करू शकतात.
दिनांक: 27-02-2026, स्थान: अमरावती
स्वा/-(प्राधिकृत अधिकारी), फेडबँक फायनॅन्शिअल सर्व्हिसेस लि.

बँक ऑफ इंडिया
नातं बँकिंग पलिकडचं
आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस महावीर उद्यान समोर,रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : zo.vldarbha@bankofindla.bank.in
सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत
वाहनांच्या ई-लिलावाद्वारे विक्री सूचना
वि सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्टरक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 6(2) च्या तरतुदीसह सरफेसी ॲक्टच्या सादरीकरणाच्या आधी हायपोथीकेशन कलम अंतर्गत स्थावर वाहनांच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषत: खालील कर्जदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा भौतीक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर वाहनांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित वाहन तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी प्रत्येक सुरक्षित वाहनासमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लेटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.
ई-लिलावाची तारीख आणि वेळ 30-03-2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00
(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सादर झाल्याच बोलीदारांना मुदत वाढीच्या अटीसह)
वाहनाच्या तपासणीची तारीख आणि वेळ 04-03-2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00
संपर्क व्यक्ती : श्री शुभम मस्के मो.8237771144, श्री स्वप्नील अग्रवाल मो. 8888334383

अ. क्र.	शाखा	वाहनाचे कर्जदार/ जामीनदार/खरेदीदार/ भागीदार/महाभदाराचे नांव	विक्री करावयाच्या वाहनांची माहिती	बँकाच्या देयकाची माहिती	ताबा प्रकार	किमान राखीव किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.
1	बाबुपेठ	श्री बिस्वजित अमुल्य देवनाथ (कर्जदार-हायपोथीकेटर)	Honda Amaze 1.2 MT S(O) i-VTEC (Petrol) BS4 Reg. No.- MH34BF3956 Chassis No.: MAKDE15JHN203355 Engine No.: L12B35137745 Year of Manufacture: 09/2017	रू. 6,72,257.88 + 30/11/2018 एनपीए च्या तारखेपासून युसीआय +इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 2,08,000/-	रु. 20,800/-
2	राळेगांव	श्री हरीचंद्र बंडुजी पांडळ (कर्जदार-हायपोथीकेटर)	Nissan Datsun Go + T (Petrol) BS 4 Reg. No.- MH29BC2651 Chassis No.: MDHJBAADOJ1701208 Engine No.: HR127872260 Year of Manufacture: 01/2018	रू. 3,67,025.73 + 21/10/2019 एनपीए च्या तारखेपासून युसीआय +इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 1,21,000/-	रु. 12,100/-
3	अमरावती	श्री शेख फैजान शेख छोटु (कर्जदार-हायपोथीकेटर)	Mahindra Scorpio ND AT 2WD Z8L 6S Reg.No.: MH27DL4487 Engine No.: YGP4K48640 Chassis No.: MA1TJ2YHTPK88133 Year of Manufacture: 2023	रू. 22,05,164.50 + 22,05,2025 एनपीए च्या तारखेपासून युसीआय +इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 13,87,000/-	रु. 1,38,700/-
4	वर्धा	श्री अजय झानेश्वर अतराम (कर्जदार-हायपोथीकेटर)	Maruti Suzuki Alto 800 LXI (Petrol) Reg. No.- MH32AH1640 Year of Manufacture: 2017	रू. 2,81,849.23 + 14/02/2020 एनपीए च्या तारखेपासून युसीआय +इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 80,000/-	रु. 8,000/-

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :
1) ई-लिलाव "जे आहे जेथे आहे, आणि "" जे काही आहे ते आहे आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल.
2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करण घेण्यासाठी कृपया https://bankofindia.bank.in ला भेट द्या.
a) ई-लिलाव सेवा पुरवठा दारायाच वेबसाईटचा पत्ता : https://baanknet.com/. बोलीदार हे https://baanknet.com/ येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
टप्पा - 1 : बोलीदारांची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईएफटी/हस्तांतरण ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकाल: इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपुर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत.
3) वाहने "जशी आहे मिथे आहे", "जशी आहे जे आहे" आणि "जशी आहे परिस्थिती आहे" या तत्वावर विकली जातात आणि इच्छुक बोलीदारांनी बँकेच्या शुल्का व्यतिरिक्त कोणत्याही वाय्यावदल्ट, कोणत्याही प्राधिकरणाच्या वाहनांवरील शुल्काबाबत, प्रलंबित आरटीओ कर, विमा इत्यादीबाबत गोपनीय चौकशी करावी आणि त्यांची बोली सादर करण्यापुर्वी वाहनाचे मालकी हक्क, व्यापती गुणवत्ता आणि प्रभाण याबबदल स्वत:ची खात्री करुन घ्यावी. ऑनलाईन बोली सादर केल्यानंतर विक्रीसाठी ठेवलेल्या वाहनांबाबत, वाहनारील शुल्क/भार किंवा इतर कोणत्याही बाबींबाबत कोणत्याही स्वरुपाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.
4) बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी वाहनांच्या संदर्भात पाहणी करुन स्वत:ची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन वाहनाची पाहणी करावी येईल. वाहनांच्या पाहणीसाठी दिनांक : 04.03.2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.
5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात याव्यात.
6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.
7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल. जर राखीव किंमत रु.3,00,000/- पेक्षा जास्त आणि रु.3,00,000/- पेक्षा कमी असेल तर रु.2,000/- (रु.दोन हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.
8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परतावा करण्यात येईल.
9) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) ठेवीवर किंवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्याच्यावे मगणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून तावडतोब त्याच दिवशी किंवा काही कारणासाठी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याचा मगणा करावा लागेल. खरेदी किंमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यास अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदारांने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास स्वतंत्र आहे.
10) वेबसाईटवरील लिलावामध्ये सहभाग आणि बोली लावणे हे सबमे जाईल की बोली लावणा-याने लिलावाशी संबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.
11) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्कची अडचण/वीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. असे प्रसंग होऊ नयेत यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम असावे आणि योग्य सज्ज पॉवर बॅकअप त्यांच्याकडे असावा.
12) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पुढे ढकलणे/ रद्द करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतेही वाहन मागे घेणे याचा सर्वुणी अधिकार सुरक्षित कर्जदार/प्राधिकृत अधिकारी कडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित वहानांचा तपशील सुरक्षित कर्जदार/ प्राधिकृत अधिका-यांच्या माहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी याला सुरक्षित कर्जदार/ प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.
13) खरेदीदारांना वाहनाशी संबंधित स्टॅम्प ड्युटी, विक्री प्रमाणपत्रासह शुल्क, नोंदणी शुल्क सरकारला देय असलेले सर्व विवाधिक देयके, कर आणि दर आणि जावक विद्यमान आणि भविष्यातील दोन्हा खर्च सहन करावे लागतील. विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदारांच्या/अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.
14) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्टरक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस ॲन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि हायपोथीकेशन कायदा अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम/शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांना संपर्क साधून प्राप्त करता येईल.
15) एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रद्द केली जाणार नाही. वापरकर्त्याचा नोंदणीकृत आयडीवरुन केलेल्या सर्व बिड त्याने/तिने केल्या आहेत असे मानले जाईल.
16) ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार,जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.
कर्जदार/जामिनदारांना विक्री सुचना
ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल 2002, च्या नियम 8(2)अंतर्गत कर्जदार आणि जामिनदारांना (रल/आर.एस.)
यांना वैधानिक विक्री सूचना म्हणून देखील मानली जाईल
माननीय महोदय/महोदया,
निम्न स्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार यांना दी विक्रीची सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वैधानिक देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली उपरोक्त नमूद केलेल्या आणि कायदेशर मालिक नंद, शुल्क आणि भार वेरी नांचा भरणा करण्यात असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुम्हाकडून उपरोक्त नमूद रक्कमेच भरणा 60 दिवसांमध्ये करण्याविषी कलम 13(2) (अंतीम मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही 60 दिवसांच्या मुदतीनंतरची रक्कमेच भरणा कर रकमा नाहीत म्हणून प्राधिकृत अधिका-यांना कलम 13(4) (च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली उपरोक्त परिशिष्ट मध्ये देण्यात आलेल्या सुरक्षित वहानाचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या रक्कमेचा भरणा करावा आणि जर असे न झाल्यास वहानाची विक्री करण्यात येईल आणि जर काही विक्रीतक अस्थायक तुम्हाकडून यात आणि चार्जेस वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, याची सूचना, तसा घेणे, वहानाचे मुल्यांकन आणि विक्री संबंधी कार्यवाही करणे कार्य प्राधिकृत अधिका-याकडून कळण्यात येईल आणि प्रश्न तो वजा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उपरित योग्य भाग उपरोक्त नमूद तुम्हाला लागू असणा-या देण्यांसाठी वापरण्यात येईल. अटी आणि शर्ती वाचर आणारिच असलेल्या लिलावामधे तुम्ही आवश्यक त्या बयाणा ईएमडी रकमेचा भरणा करुन सहभागी होऊ शकाल.
ठिकाण : वर्धा
दिनांक : 27.02.2026
(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राहय मानली जाईल)
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

Bandhan Bank
रीजनल कार्यालय: नेताजी मार्ग, मिठाकली सिक्स रस्त्यांजवळ, एलिसब्रिज, अहमदाबाद-6.
फॅक्स: +91-79-26560649 | टोल फ्री क्र.: 18002335300
वेबसाइट: www.bandhan.bank.in
विक्री नोटिशीसाठी लिलाव सह निविदा
सरफैसी अधिनियम, 2002 अंतर्गत तसेच सिक्युरिटी इंट्रेस्ट (इन्फोर्समेन्ट) नियम, 2002 च्या नियम 8(6) प्रती संदर्भासह नियम 9(1) प्रती परंतुक याअंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.
याद्वारे जनतेला तसेच विशेषत: कर्जदारांना (कर्जदारांना) आणि हमीदारांना (हमीदारांना) सूचना देण्यात येते की प्रतिमूत्र धनकोकडे गहाण/चार्ज देण्यात आलेल्या आश खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तांची विक्री, ज्यांचा वास्तविक ताबा बंधन बँक लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घे

करिअर वृत्तांत

मुलांना काय विचार करायचा हे नाही तर कसा विचार करायचा हे शिकवले पाहिजे.
- मार्गरेट मीड,
अमेरिकन मानवंशशास्त्रज्ञ

स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात
एमपीएससी
फारुक नाईकवाडे

राज्य सेवा मुख्य परीक्षा - सामान्य अध्ययन (पेपर दोन)

आदर्श उत्तरे

राज्य सेवा मुख्य परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर दोनच्या तयारीच्या आधारे वेगवेगळ्या मह्त्वांवरील प्रश्नांची उत्तरे कशी लिहावीत याबाबत चर्चा करण्यात येत आहे. या लेखामध्ये सामान्य अध्ययन पेपर दोन मधल्या आरोग्य, शिक्षण, मानव संसाधन यासारख्या सामाजिक क्षेत्र, सेवांशी निगडीत घटकांच्या विकास व व्यवस्थापन संबंधातले प्रश्न या मुद्द्यावरील प्रश्नाचे उत्तर लेखन कशा प्रकारे करता येईल ते पाहू.

■ **सार्वजनिक आरोग्यव्यवस्था यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रात, व्यवस्थेच्या वाढत्या बाजारीकरणामुळे निर्माण होणाऱ्या प्रतिकूल परिणामांना आळा घालण्यासाठी राज्याने प्रभावी भूमिका बजावणे आवश्यक आहे. राज्य सार्वजनिक आरोग्यसेवेचा तळागाळापर्यंत विस्तार कसा वाढवू शकते? उपाय सुचवा. (१५ गुण, २५० शब्द)**

उत्तर क्र. १ : आरोग्य हा मानवी सन्मानाशी निगडित मूलभूत अधिकार आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद ४७ नुसार सार्वजनिक आरोग्य ही राज्याची जबाबदारी आहे. मात्र आरोग्य क्षेत्रातील वाढते बाजारीकरण आरोग्यसेवांच्या समान उपलब्धतेमध्ये अडथळा ठरत आहे.

बाजारीकरणाचे प्रतिकूल परिणाम

- **उपलब्धतेतील विषमता:** श्रीमंतांसाठी खासगी सेवा, गरीबांसाठी अपुरी सार्वजनिक सेवा.
- **ग्रामीण-शहरी दरी:** ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची कमतरता.
- **वाढता स्वतःच्या खिशातील खर्च:** राष्ट्रीय आरोग्य लेखा (२०१९-२०) नुसार सुमारे ४७% खर्च हा विमा अथवा योजनांऐवजी स्वतःच्या खिशातून.
- **नफेखोरी व व्यापरीकरण:** अनावश्यक तपासण्या व औषधोपचार.
- **प्रतिबंधात्मक आरोग्याकडे दुर्लक्ष:** उपचाराधारित सेवांना प्राधान्य.

बाजारीकरणावर नियंत्रणासाठी राज्याची भूमिका

- **औषध व उपचार दर नियंत्रण :** नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ऑथॉरिटीमार्फत किंमत नियंत्रण.
- **सार्वजनिक आरोग्य बळकटीकरण :** प्राथमिक आरोग्य केंद्रे व सरकारी रुग्णालये सक्षम करणे.
- **सार्वत्रिक आरोग्य संरक्षण :** आयुष्मान भारतद्वारे गरीबांना मोफत उपचार.
- **स्वस्त औषधे उपलब्धता :** प्रधानमंत्री भारतीय जनौषधी परियोजना अंतर्गत जनऔषधी केंद्रे. आरोग्य विमा व खासगी क्षेत्र नियमन.

तळागाळापर्यंत पोहोच वाढवण्यासाठी उपाय

- **विकेंद्रीकरण :** पंचायत राज संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार.
- **समुदाय सहभाग :** आशा व अंगणवाडी सेविकांचा सक्रिय वापर.
- **प्रतिबंधात्मक आरोग्यावर भर :** लसीकरण, पोषण, स्वच्छता.
- **तंत्रज्ञान वापर :** ईसंजीवनी द्वारे. टेलिमेडिसिन. आरोग्यावरील अर्थसंकल्पीय वाढ.

निष्कर्ष

आरोग्य ही वस्तू नसून मूलभूत हक्क आहे. प्रभावी नियमन, सार्वजनिक गुंतवणूक आणि समुदाय सहभागाद्वारे राज्य समतोल व परवडणारी आरोग्यव्यवस्था निर्माण करू शकते.

उत्तर क्र. २ : आरोग्य हा घटनेच्या अनुच्छेद २१ मधील सम्मानाने जगण्याशी संबंधित मूलभूत अधिकार असून घटनेच्या अनुच्छेद ४७ नुसार सार्वजनिक आरोग्य ही राज्याची जबाबदारी आहे. आरोग्य क्षेत्रातील वाढते बाजारीकरण रोखण्यासाठी आणि आरोग्य सेवांचा तळागाळापर्यंत विस्तार वाढवण्यासाठी राज्याने संरचनात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी पुढील उपाययोजना शक्य आहेत:

सार्वजनिक गुंतवणूक व पाया भूत सुविधा बळकटीकरण

- **आरोग्यावरील खर्च वाढवणे :** सार्वजनिक आरोग्य खर्च GDP च्या २.५% पर्यंत नेणे.
- **प्राथमिक आरोग्य बळकटीकरण :** उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रूपांतर सर्वसमावेशक आरोग्य केंद्रांमध्ये करणे. आवश्यक औषधे/निदान सुविधांची २४ x७ उपलब्धता. गैर-संसर्गजन्य रोग (NCD) तपासणी व सर्वसमावेशक प्राथमिक सेवांचा विस्तार.

मानवी संसाधन विकास

- **ग्रामीण सेवेसाठी प्रोत्साहन:** जास्त वेतन, निवास व पदोन्नती सेवी देऊन डॉक्टर/तज्ज्ञांना ग्रामीण भागात सेवांसाठी आकर्षित करणे.
- **फ्रंटलाईन कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण :** आशा, अंगणवाडी सेविका यांना प्रशिक्षण व योग्य मानधन.
- **आयुष समावेशन :** आयुष मंत्रालया अंतर्गत आयुर्वेद/योग तज्ज्ञांचा समावेश ग्रामीण आरोग्य सुविधांमध्ये करणे

तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

- **टेलिमेडिसिन विस्तार :** ईसंजीवनी द्वारे ग्रामीण रुग्णांना तज्ज्ञांशी जोडणे.
- **डिजिटल आरोग्य नोंदी :** आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंमलबजावणी. मोबाईल हेल्थ युनिट्सचा वापर.

आर्थिक संरक्षण व नियमन

- **विमा कवच विस्तार:** आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) चा विस्तार करून रुग्णांचा प्रत्यक्ष खर्च कमी करणे.
- **खासगी क्षेत्र नियमन:** वैद्यकीय आस्थापना कायदा आणि अंमलबजावणी व राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरण यांच्या मारफत गुणवत्ता आणि दर नियंत्रण.

समुदाय सहभाग व प्रतिबंधात्मक आरोग्य

- ग्रामीण आरोग्य, स्वच्छता आणि पोषण समित्यांचे सक्षमीकरण व विकेंद्रीत नियोजन.
- लसीकरण, स्वच्छता, पोषण मोहिमा (उदा. पोषण अभियान).
- जनजागृती व आरोग्य साक्षरता वाढवणे.

निष्कर्ष

सार्वजनिक गुंतवणूक वाढवून, खासगी क्षेत्रावर प्रभावी नियंत्रण ठेवून व तंत्रज्ञानाचा वापर करून राज्य आरोग्यसेवा ही वस्तू नसून मूलभूत हक्क आहे हे सुनिश्चित करू शकते.

स्पष्टीकरण

प्रश्नामध्ये बाजारीकरणाच्या प्रतिकूल परिणामांना आळा घालण्यासाठी राज्याची भूमिका आणि सार्वजनिक आरोग्य सेवांच्या विस्तारासाठीच्या उपाययोजना विचारलेल्या आहेत.

उत्तर क्रमांक एक मध्ये बाजारीकरणाचे प्रतिकूल परिणाम नमूद केलेल आहेत. यामुळे उत्तराचा बराच भाग अनावश्यक मुद्यांमध्ये वाया गेला आहे. प्रश्न व्यवस्थित समजून घेऊन नेमके काय विचारले आहे ते लक्षात घेणे उत्तर लेखनासाठी आवश्यक आहे.

steelframe.india@gmail.com

बळ कुशल हातांना
साहेबराव धनवडे

चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या काळात तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. यंत्रे, उपकरणे आणि प्रणाली परस्परांशी संवाद साधू लागत्या आहेत. या बदलत्या वास्तवाशी सुसंगत असे कौशल्याधारित शिक्षण देण्याच्या दिशेने औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) पुढे जात असून, त्याचाच एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्स) हा नव्याने सुरू झालेला ट्रेड.

आयटीआयमधील 'आयओटी'चा अभ्यास

इंटरनेट ऑफ थिंग्स म्हणजे सेन्सर, सॉफ्टवेअर आणि इंटरनेट्च्या साहाय्याने विविध उपकरणे एकमेकांशी जोडणे व त्यातून माहितीचे संकलन, विश्लेषण आणि नियंत्रण करणे. आज स्मार्ट मोबाइल, स्मार्ट टीव्ही, वॉशिंग मशीनपासून ते औद्योगिक यंत्रणा, वाहतूक व्यवस्था, शेती, आरोग्य सेवा आणि स्मार्ट सिटीपर्यंत सर्वत्र आयओटीचा वापर वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची गरज मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे.

आयटीआयमधील आयओटी ट्रेड हा पूर्णपणे प्रात्यक्षिकांवर आधारित असून विद्यार्थ्यांना सेन्सर, मायक्रोकंट्रोलर, नेटवर्किंग, डेटा कम्युनिकेशन, क्लाउड बेसिक्स, ऑटोमेशन आणि स्मार्ट डिव्हाइस कंट्रोल यांचे मूलभूत प्रशिक्षण दिले जाते. यासोबतच इलेक्ट्रॉनिक्स, बेसिक प्रोग्रामिंग आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थी केवळ यंत्र हाताळणारे नसून, तंत्रज्ञान समजून घेणारे कुशल तंत्रज्ञ बनतात.

या ट्रेडचे महत्त्व केवळ उद्योगपुरते मर्यादित नाही. स्मार्ट शेतीतून पाण्याचे नियोजन, पीक संरक्षण, आरोग्य क्षेत्रात रिमोट मॉनिटरिंग, उद्योगांमध्ये ऑटोमेशन आणि ऊर्जा बचत, वाहतूक व्यवस्थेत स्मार्ट सोल्यूशन्स अशा विविध क्षेत्रांत आयओटीचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे आयओटी ट्रेड पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना उद्योग, सेवा क्षेत्र, स्टार्टअप्स आणि स्वयंरोजगार अशा अनेक संधी उपलब्ध होतात.

आयओटी ट्रेड पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी, टेक्निशियन, फील्ड असिस्टंट, ऑटोमेशन ऑपरेटर, आयओटी सपोर्ट एग्झिक्युटिव्ह अशा पदांवर काम करण्याची संधी मिळते. तसेच पुढे पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी पदविका किंवा उच्च शिक्षणाच्या मार्गाने प्रगत तांत्रिक शिक्षणही घेता येते. डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटी आणि इंडस्ट्री ४.० या संकल्पनांच्या यशासाठी आयओटी तंत्रज्ञान कणा ठरणार आहे. त्या दृष्टीने आयटीआयमधील आयओटी ट्रेड हा ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील रोजगारक्षम कौशल्यांचे दार उघडणारा ठरत आहे. योग्य प्रशिक्षण, सतत अपडेट राहण्याची तयारी आणि नावीन्यपूर्ण विचारसरणी असल्यास आयओटी हे करिअरचे मजबूत साधन ठरू शकते.

(शिल्प निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोखाडा.)
saheb_1977@yahoo.co.in

लोकसत्ता विश्लेषण

३१ मार्चपर्यंत देश नक्षलमुक्त होणार का?

मे २०२५ मध्ये सुरक्षा यंत्रणानी सीपीआय (माओवादी) महासचिव नंबाला केशवराव उर्फ बसवराजूला ठार केल्यानंतर नक्षल चळवळीची ऐतिहासिक पीछेहाट झाली आहे. संघटनेचा वैचारिक चेहरा भूपती उर्फ सोनूच्या आत्मसमर्पणानंतर सर्वोच्च नेता देवजीनेही शस्त्र सोडण्याचा निर्णय घेतल्याने ३१ मार्चपर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार होणार असल्याच्या दाव्याला अधिक बळ मिळाले आहे.

सुमित पाकलवार

■ **नक्षल चळवळीत देवजीचे महत्त्व काय होते?**

नक्षलवादी चळवळीचा सर्वोच्च नेता थीप्पिरी तिरुपती उर्फ देवजी याने तेलंगणा पोलिसांसमोर केलेले आत्मसमर्पण ही भारतीय सुरक्षा दलांची मोठी कामगिरी मानली जाते. मूळचा तेलंगणातील असलेला देवजी १९८० च्या दशकात विद्यार्थी राजकारणातून नक्षलवादाकडे वळला. त्याने सुमारे १५ वर्षे महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात संघटक आणि डिव्हिजनल कमिटी सदस्य म्हणून काम केले. या भागात नक्षलवादी चळवळ रुजवण्यात त्याचा मोठा वाटा होता. १९९६मध्ये दंडकारण्यात नक्षलवाद्यांची पहिली सशस्त्र प्लाटून तयार करण्यात आली, त्याचा तो पहिला कमांडर होता.

तो संघटनेच्या 'केंद्रीय समिती' आणि 'सेंट्रल मिलिटरी कमिशन' या सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या संस्थांचा महत्त्वाचा सदस्य होता. गेल्या वर्षी बसवराजूच्या मृत्यूनंतर त्याने चळवळीची धुरा सांभाळली होती. संजीव, चेतन, सुदर्शन आणि रमेश अशा विविध नावांनी सक्रिय असलेला देवजी शरण आल्यामुळे नक्षलवाद्यांची सर्वोच्च फळी आता खिळखिळी झाली आहे.

■ **नक्षल चळवळीची सद्य:स्थिती काय?**

गृहमंत्री अमित शहा यांनी मार्च २०२६ पर्यंत नक्षलमुक्त भारत करण्याच्या सूचना दिल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी सर्वच स्तरावर केलेल्या नियोजनबद्ध कारवायांमुळे नक्षल चळवळीचे मागील दोन वर्षात सर्वांत मोठे नुकसान झाले. गेल्या दोन वर्षात २,१०० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. त्यापैकी केंद्रीय समितीचे सहा सदस्य होते. त्यात पॉलीट ब्युरो आणि केंद्रीय समिती सदस्य सोनू उर्फ भूपती, रुपेश उर्फ आशन्ना याचा समावेश आहे. भूपती हा नक्षल चळवळीचा वैचारिक प्रमुख होता. याच काळात सहा ते सात केंद्रीय समिती सदस्यांसह ५०० हून अधिक नक्षलवादी चकमकीत मारले गेले. संघटनेचा सर्वोच्च नेता नंबाला केशवराव उर्फ बसवराजू आणि माडवी हिडमाच्या मृत्यूमुळे नक्षल चळवळीला जबर धक्का बसला. आता देवजीसुद्धा पोलिसांना शरण आला आहे. त्यामुळे नक्षल चळवळ पूर्णपणे नेतृत्वहीन झाली आहे.

■ **अंतर्गत मतभेदाचा फटका?**

आत्मसमर्पणापूर्वी वरिष्ठ नक्षलनेता सोनू उर्फ भूपती याने शांतता वाटाघाटी तसेच शस्त्रविरामासंदर्भात संघटनेतील इतर नेत्यांनी विचार करावा, असे आवाहन पत्रकाच्या माध्यमातून केले होते. या आवाहनाला काही नेत्यांनी सकारात्मक प्रतिसादही दिला. तर काहींनी नकार दिला. नक्षल नेतृत्वात अंतर्गत मतभेद होण्यास २०११ पासूनच सुरुवात झाली होती.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २०११ साली झालेल्या वरिष्ठ नक्षल नेत्यांच्या एका बैठकीत भूपतीने संघटनेची रणनीती बदलण्याची सूचना केली होती. भविष्यातील धोका ओळखून लष्करी कारवाया कमी करून अधिकाधिक लोकांचे समर्थन (जनाधार) मिळवण्यावर त्याने भर दिला होता. मात्र, संघटनेतील एक मोठा गट आक्रमक लष्करी कारवायांच्याच बाजूने होता. तेव्हापासूनच संघटनेत वैचारिक दुफळी निर्माण झाली होती. फेब्रुवारी २०२४ मध्ये, गडचिरोली सीमेला लागून असलेल्या अबूझमाड भागात वरिष्ठ नक्षल नेत्यांची बैठक झाली. यात गणपती, मिशीर बेसरा, कट्टा रामचंद्र रेड्डी, बसवराजू आणि भूपती या केंद्रीय समिती सदस्यांचा समावेश होता. या बैठकीत वर्तमान परिस्थिती लक्षात घेता चळवळीची रणनीती बदलण्यावर सर्वांचे एकमत झाले होते. पण हिडमा आणि देवजी यावर सहमत नव्हते.

■ **नक्षलविरोधी मोहीम कितपत यशस्वी?**

२०१४ ते २०२४ या दशकात नक्षल प्रभावित क्षेत्रात हिंसक घटनांची संख्या कमी होऊन ७,७४४ पर्यंत खाली आली आहे, जी मागील दशकापेक्षा सुमारे ५३ टक्के कमी आहे. तसेच, २०१० मधील सर्वाधिक हिंसक घटनांची संख्या (१,९३६) घटून २०२४ मध्ये केवळ ३७४ पर्यंत आली आहे, जी ८१ टक्के इतकी आहे.

नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेले जिल्हेदेखील १७५ वरून ७ पर्यंत आले आहेत. सध्याच्या घडीला नक्षल संघटनेतील पॉलिट ब्युरो आणि केंद्रीय समितीचे मुप्पाला लक्ष्मण राव उर्फ गणपती (७५), मिशीर बेसरा उर्फ सागर (६३) हे २ नेते शिल्लक आहेत. सक्रिय सदस्यांची संख्या देखील १५० च्या आत आहे. छत्तीसगडमधील सुकमा, बिजापूर आणि नारायणपूर हे केवळ तीन जिल्हे अतिनक्षल प्रभावित आहेत. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा देखील अतिसंवेदनशील पटातून वगळण्यात आला आहे. नक्षल्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या अबुझमाड आणि राष्ट्रीय उद्यान परिसरातील अनेक गावांमध्ये पोलीस मदत केंद्रांची स्थापना करून मोठ्या प्रमाणात असलेली सुरक्षा पोकळी भरून काढली जात आहे.

हिंसाचारात देशाचे मोठे नुकसान?

नक्षलवाद्यांनी गेल्या पाच दशकात केलेल्या हिंसाचारामुळे देशाचे मोठे नुकसान झाले. दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षात, २००४ पासून ३१ मार्च २०२५ पर्यंतच्या कालावधीत, एकूण ८,८९५ लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे, ज्यात नागरिक आणि सुरक्षा दलाचे जवान दोघांचाही समावेश आहे. विशेषत:, २००४ ते २०१४ या दशकात नक्षलवादी हिंसेच्या १६,४६३ घटनांची नोंद झाली, ज्यामध्ये ४,७६६ नागरिकांनी आणि १,८५७ सुरक्षा दलाच्या जवानांनी प्राण गमावले. या हिंसाचारामुळे पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले असून, पूल, रस्ते, रेल्वेमार्ग आणि वीजवाहिन्या वारंवार लक्ष्य करण्यात आल्यामुळे नक्षल प्रभावित भाग विकासापासून वंचित राहिला. नक्षलविरोधी मोहिमांसाठी केवळ हेलिकॉप्टर आणि सुरक्षा छावण्यांसाठी पायाभूत सुविधांवर खर्च करण्यासाठी २०१४ ते २०२५ या काळात तब्बल दीड हजार कोटींहून अधिक निधी खर्च करण्यात आला.

करिअर मंत्र
विवेक वेतणकर

● **मी सध्या बीएससी बॉटनीच्या शेवटच्या सत्रात आहे. माझे वय २३ वर्षे आहे. मला दहावीत (इंग्रजी माध्यम) ८० टक्के गुण होते आणि बारावी सीबीएसई बोर्डात ६१ टक्के गुण होते. मी मुक्त विद्यापीठातून बीए आर्ट्स पूर्ण केले आहे. माझे इंग्रजी आणि इतिहास हे विशेष विषय होते. निसर्गाबद्दल शिकणे हा माझा छंद आहे. मला एमपीएससी वन विभागाची परीक्षा द्यायची आहे. पदवी पूर्ण झाल्यानंतर मी काय करावे?**
- तुषार पावरा, नंदुरबार

– आपण बॉटनी या विषयातून पदवी प्राप्त करत असल्याने एमपीएससी वन विभागाची परीक्षा देण्यासाठी पात्र आहात. या परीक्षेत पूर्व, मुख्य परीक्षा आणि मुलाखत तसेच वैद्यकीय तपासणी हे चार टप्पे असतात. आता तुम्ही पूर्व आणि मुख्य दोन्ही परीक्षांसाठी तातडीने तयारी सुरू करणे आवश्यक आहे. विशेषत: सामान्य ज्ञान, चालू घडामोडी या विषयांच्या अभ्यासासाठी खूप वाचन करावे लागेल. शक्य त्या तयारीवर येईल त्या परीक्षेला सामोरे जा जेणेकरून तुम्हाला परीक्षेचा आवाका आणि तुमच्या तयारीतल्या त्रुटी लक्षात येतील, त्या दुरुस्त करण्यासाठी एक वर्षाचा कालावधी गेला तरी चालेल, जेणेकरून पुढच्या वेळी तुम्ही थोडे तागरहित व्हाल.

● **एन्व्हायर्नमेंटल सायन्स अँड सस्टेनिबिलिटी या अभ्यासक्रमाविषयी कृपया माहिती सांगा व त्यासाठी महाराष्ट्र मध्ये किती जागा आहेत? नोकरीला वाव आहे का?**
-स्वजीत चौधरी, छत्रपती संभाजीनगर

– हा कोर्स पदवी आणि मास्टर्स या दोन्ही साठी महाराष्ट्रातील अनेक संस्थांमध्ये उपलब्ध आहे. प्रवेश मिळणे फार अवघड नाही, मात्र संस्थेची निवड करताना गेल्या ४-५ वर्षांत तिथून कॅंपस प्लेसमेंट मधून किती विद्यार्थ्यांना कुठे कुठे आणि किती पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या आहेत हे बघून घेणे खूप आवश्यक आहे.

careerloksatta@gmail.com
(लेखक बीई, एमबीए असून गेली २५ वर्षे करिअर मार्गदर्शन करत आहेत.)

शब्दकोडे- ३५२



आडवी विधाने : (१) आमिष, लालुच (४) चैन, सुख (७) चक्र (८) गडद, दाट (९) होडी, नाव (१०) मोठ्या माणसाशी संधान (१३) साल, वर्ष (१४) मातीचा कणही नसलेली खडकाळ जमीन (१५) रागावलेला (१७) कोळशाचा व्यवसाय करणारी जमात (२०) लहर, पाण्यावर वेणारे मोठे तरंग (२३) प्रत्येक गोष्टीला नकार देणे (२५) किंचित अंश, मागमूस (२७) रसवेता, रसिक (२८) सलमान खानचा एक सिनेमा (२९) 'चला हवा येऊ द्या' कार्यक्रमातील अभिनेता - भाऊ XXX (३१) पक्ष्यांची किलबिल (३२) घराच्या छपरावर कौले किंवा पेंढा घालणे

उभी विधाने : (१) लोकमतावर प्रभाव पाडण्यासाठी पसरवलेली माहिती (२) जन, रयत (३) मोठ्या वस्तीचे गाव, शहर (४) इंद्राचा हत्ती (५) आवाज, ध्वनी (६) स्त्री, नारी (९) मुलगा, लेक (११) गळणारा, पाझरणारा (१२) बाकी, शेष (१३) शीग मारलेला, मापाच्या काठाबरोबरचा (१४) श्रवणेंद्रिय (१५) आरडाओरडा, गोंधळ (१६) प्रसिद्ध अभिनेत्री - प्राजक्ता XX (१८) हद्दपार (१९) ४८० कागदांचा गठ्ठा (२१) घोर दारिद्र्य, अन्नासाठी दारोदार फिरावे लागावे अशी परिस्थिती (२२) 'चितचोर' या चित्रपटाचा नायक (फक्त आडनाव) (२४) कोसळणे, पाया खचून पडणे (२६) न्यायालयात आपल्या पक्षकाराची कैफियत मांडणारा व केस चालवणारा (३०) कणीस, भुट्टा

- चारू नानल

सुडोकू - ३५२

	८	२		१		७		
	७				३		९	१
१			८		५			२
	१	१		३		५		
८			१		१			३
		६		८		४	१	
५			७		२			८
२	४		६				५	
		७		५		१	२	

सुडोकू - ३५१ चे उत्तर

४	१	६	२	८	७	३	५	१
७	५	१	१	४	३	८	६	२
८	२	३	६	५	१	७	१	४
१	३	५	७	२	६	१	४	८
२	४	७	१	१	८	६	३	५
६	८	१	४	३	५	१	२	७
३	७	२	८	६	४	५	१	१
५	१	४	३	७	१	२	८	६
१	६	८	५	१	२	४	७	३

शब्दकोडे - ३५१चे उत्तर